# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 19 August 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कामकाजासंदर्भात आढावा बैठक सुरु आहे. या आढावा बैठकीत बँकांच्या ठेवी, कर्ज-ठेवी गुणोत्तर आणि मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली वाढ यांचं  मूल्यमापन करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम सूर्य घर आणि प्रधानमंत्री विश्व कर्मा योजनांचाही या बैठकीत आढावा घेतला जाणार आहे.

***

कोलकाता इथल्या आरजीकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचार आणि हत्त्येच्या पार्श्वभूमीवर पद्म पुरस्काराने सन्मानित सत्तरहून अधिक डॉक्टरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या प्रकरणात वैयक्तिकरित्या हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कायदा करण्याची मागणी करत आजही दिल्ली इथं निवासी डॉक्टरांचा संप सुरु आहे. या प्रकरणाची  सर्वोच्च न्यायालयानं स्वत:हून दखल घेतली असून  सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या.जे.बी.पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर उद्या मंगळवारी सुनावणी होणार आहे.

***

देशातील पहिला एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता कुंभमेळा नाशिकमध्ये होणार आहे. या अनुषंगानं काल नाशिकमध्ये तंत्रज्ञान आणि परंपरेचा संगम साधणाऱ्या, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पहिल्या बिल्डथॉनचं, उद्घाटन विभागीय

आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या हस्ते झालं. यावेळी राज्य शासनाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी चौधरी यांनी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धीमत्ता साधनांवर आधारित सादरीकरण केलं. कुंभथॉनच्या अधिकृत संकेतस्थळाचं तसंच कुंभ मेळ्यासाठी समर्पित एआय – सक्षम चॅटबॉटचं उद्धाटनही यावेळी करण्यात आलं.

***

राज्याच्या कृषी विभागातर्फे परवा २१ ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यात परळी वैद्यनाथ इथं पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल या महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला. या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशा अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते, तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या महोत्सवाचं उद्धाटन होणार आहे.

***

जम्मू काश्मीरमधील वार्षिक अमरनाथ यात्रा आज श्रावणी पौर्णिमेला संपन्न होत आहे.या यात्रेमध्ये यावर्षी देशभरातून पाच लाखांहून अधिक भाविकांनी अमरनाथ इथल्या पवित्र गुहेचं दर्शन घेतलं,यावर्षीची भाविकांची संख्या विक्रमी ठरल्याचं याबाबतच्या वृत्तात नमुद करण्यात आलं आहे.

***

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महिलांना मिळायला राज्यभरात सुरुवात झाली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक बँकांमध्ये महिलांच्या रांगा लागल्या आहेत, तर या लाभासाठी महिलांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.आज रक्षाबंधनाच्या निमित्तानं मिळालेली ही भेट मोलाची आहे, अशी प्रतिक्रिया अनेक महिलांनी आकाशवाणीशी बोलतांना दिली आहे.

***

बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा राखी पौर्णिमेचा सण आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरीकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भाऊ आणि बहिणींच्या अनोख्या नात्याचा हा सण असून यामुळे प्रेम आणि विश्वासाचं नातं बळकट होतं, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.उपराष्ट्रपती जगदीप धनकड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवाशियांना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांना राख्या बांधून आज रक्षाबंधन साजरे केलं. रक्षाबंधन पालघर जिल्ह्यात विक्रमगड तालुक्यातल्या महिलांनी तयार केलेल्या पर्यावरण पूरक राख्या भारतीय सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांच्या हातावर झळकणार आहेत.

***

माजी राष्ट्रपती डॉक्टर शंकरदयाल शर्मा यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रपती भवनात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शंकर दयाल शर्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले.

***

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर-मंगळवेढा मार्गावर गोपाळपूर हद्दीत कार आणि टेम्पोची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात बहीण भावाचा जागीच मृत्यू झाला. राखी पौर्णिमेसाठी आपल्या १९ वर्षीय ऋतुजा जाधव या बहिणीला २५ वर्षांचा रोहित जाधव गावाकडे घेऊन जात असतांनाच हा अपघात घडला. अन्य एका अपघातात जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्यातल्या पिंपरखेड इथं काल चार सख्या भावंडांचा केटी वेअर धरणाजवळ पाण्यात बुडून मृत्यू झाला. यामध्ये तीन बहिणी आणि एका भावाचा समावेश आहे. सर्वात मोठी बहिण ९ वर्षांची होती तर सर्वात लहान भाऊ तीन वर्षांचा होता.

***